चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

०५ ऑगस्ट, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)

# चंद्रपुर पोलीसांची जनजागृती मोहिम अखंडीतपणे सुरू

वाढत्या आधुनिक जिवन शैलीचे विभाज्य अंग असलेले इंटरनेट त्याद्वारे होणारे गुन्हे यातुन स्वत:ला सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी ही इंटरनेट वापर करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची आहे. व त्याकरीता जागृक असणे ही काळाची गरज आहे.

पोलीस अधीक्षक चंद्रपुर डॉ. महेश्वर रेडड्ी यांचे संकल्पनेतुन चंद्रपुर जिल्हयामध्ये कम्युनिटी पोलीसींग करीता वेळोवेळी समाजातील संवेदनशिल विषयांवर जनजागृती करण्याकरीता अवेअरनेस कार्यक्रम घेण्यात येत आहेत. त्यामधीलच एक भाग म्हणुन शाळा आणि महाविद्यालयीन मुले मुली हे सायबर गुन्हे आणि इतर इंटरनेट ॲडीक्शनला बळी पळु नये या विषयावर दिनांक २०/०७/२०१७ रोजी खत्री महाविद्यालय, चंद्रपुर आणि दिनांक ०३/०८/२०१९ रोजी बीआयटी, पॉलीटेक्नीक/इंजिनिअरींग कॉलेज बल्लारशाह येथे सायबर गुन्हे व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दिवसेंदिवस इंटरनेट चा वापर मोठया प्रमाणात होत असुन दैंनंदिन प्रत्येक गोष्ट ही ऑनलाईन पद्धतीने होत आहे. त्याचप्रमाणे सोशल मिडिया चा वापर सुध्दा खुप प्रमाणात वाढला असुन इंटरनेट व सोशल मिडिया हे जिवनाचे एक मुख्य घटक म्हणुन समोर येत आहे. या सर्व साधनांचा वापर करताना सायबर गून्हे घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सर्व बांबीपासुन समाजामध्ये जागृती यावी आणि कोणीही वाईट कृत्यास बळी पडु नये या दृष्टीकोनातुन सोशल मिडियाचा उपयोग करताना काय करावे व काय करू नये याबाबत सायबर क्राईम सेल चंद्रपुर यांचे तर्फे मार्गदर्शन करण्यात आले.

सदर कार्यशाळेमध्ये सायबर क्राईम या विषयावर सायबर सेल चंद्रपुर येथील पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी पावर पॉईन्ट प्रेझेंटेशन द्वारे फेसबुक, व्हॉट्सॲप, बॅक फ्रॉड केसेस व इंटरनेट ॲडीक्शन या सर्व विषयांवर मार्गदर्शन आणि व्हिडीओ दाखवुन काही महत्वाच्या केसेस बाबत माहीती दिली. सदर कार्यक्रमात मोठया प्रमाणात विद्यार्थी आणि शिक्षकवृंद मार्गदर्शन कार्यक्रमास प्रामुख्याने उपस्थित होते.

---